# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा/२००५/प्र.क्र.३६/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २० डिसेंबर, २००५.

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी

विषय:- व्हिडिओ कॅसेटसची विल्हेवाट लावण्याबाबत...

महोदय,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोटनिवडणुकीमध्ये आचारसंहितेचे पालन काटेकोरपणे होते की नाही हे तपासण्यासाठी उमेदवारांच्या सभा किंवा उमेदवारांच्या मिरवणुका किंवा निवडणूक निर्णय अधिका-यांच्या कार्यालयांत घडणा-या निवडणूक विषयक सर्व कार्यवाहोचेदेखील व्हिडिओ चित्रीकरण करण्यात येते. हे व्हिडिओ चित्रीकरण केल्यानंतर त्या सर्व व्हिडिओ कॅसेटस नंतर कार्यालयांत पडून असतात. त्याची विल्हेवाट कशी लावावी असा प्रश्न काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिका-यांनी उपस्थित केला आहे. या व्हिडिओ कॅसेटसची विल्हेवाट लावण्याबद्दल राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे सूचना देत आहे:-

(१) व्हिडिओ कॅसेटस निवडणुका झाल्यानंतर सहा महिन्यांपर्यंत सांभाळून ठेवण्यात याव्यात.

(२) निवडणुकीनंतर सहा महिन्यांचा कालावधी पार पडल्यानंतर ज्या प्रभागाबाबत निवडणूक याचिका प्रलंबित नसेल तेथील व्हिडिओ कॅसेटस पुसून (Erase) पुन्हा उपयोगात आणवी किंवा त्याची विक्री करण्यात यावी.

(३) ज्या व्हिडिओ कॅसेटस पुसून पुन्हा वापरण्याजोग्या नसतील त्या मोडण्यात (Crushed) याव्यात.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(स्वाक्षरी)
( महेन्द्र ब. वारभुवन )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग

A:\nab१०.doc